(1)

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विविध विभागासाठी शिक्षकीय व शिक्षकेत्तर पदे मंजूर करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. एसयुके २०१३/ (२२/१३)/विशि-१

मंत्रालय, मुंबई- ४०००३२

दिनांक : ३० जानेवारी, २०१३

**प्रस्तावना :-** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठास ५० वर्ष पूर्ण झाली असल्यामुळे सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहेत. सदर सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने विद्यापीठाने खालील विभागासाठी

शिक्षक व शिक्षकेतर पदे मंजूर करण्याची विनंती केली आहे.

| अनु. क्र. | विभागाचे नाव | प्रस्तावित पदे | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | शिक्षक | शिक्षकेतर | |
| १ | स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी | २३ | १३ | ३६ |
| २ | यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट व अध्यासन | २६ | ०९ | ३५ |
| ३ | राजर्षी शाहू रिसर्च सेंटर ॲण्ड म्युझियम कॉम्प्लेक्स | ०१ | ०४ | ०५ |
| ४ | छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास केंद्र | ०२ | ०३ | ०५ |
| ५ | संग्रालय संकुल | ०० | ०४ | ०४ |
| ६ | युवा विकास केंद्र | ०१ | ०३ | ०४ |
| ७ | कन्व्हेंशंन सेंटर | ०० | २४ | २४ |
| | एकूण | ५३ | ६० | ११३ |

२. शिवाजी विद्यापीठाचा वर नमूद प्रस्ताव विचारात घेता उक्त विभागासाठी शिक्षक व शिक्षकेतर पदे मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

(2)

## शासन निर्णय

३. वर प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्ष निमित्त विद्यापीठामध्ये विविध शैक्षणिक संकुल/अध्यासन साठी शिक्षकीय व शिक्षकीतेर पदे निर्माण करण्यास दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. त्यानुसार सोबतच्या प्रपत्र 'अ' प्रमाणे एकूण ११३ पदे निर्माण करण्यास खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता देत आहे.

(१) सदर शासन निर्णयातील सर्व शिक्षकीय पदे विद्यापीठ अनुदान आयोग व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अर्हता व पात्रतेनुसार भरण्यात यावीत. तसेच सर्व शिक्षकेत्तर पदे विद्यापीठाने त्यांच्या परिनियम / विनियमानुसार विहित केलेल्या अर्हता व पात्रतेनुसार भरण्यात यावीत.

(२)सदर शासन निर्णयामध्ये यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट या विभागात संचालक तथा प्राध्यापक या पदास रु. १२०००/- ॲकडमिक ग्रेड पे मंजूर करण्यात आलेला आहे. सदर ग्रेड पे प्रत्यक्ष लागू करण्यापूर्वी शासन निर्णय क्र. एनजीसी २००९/(२४३/०९)/विशि-१, दि. १२ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २(२)(a)(xv) मध्ये नमूद केलेल्या सर्व बाबींची पूर्तता करित असल्याची खात्री करण्यात यावी.

(३) सदर शासन निर्णयातील ज्या पदांना विद्यापीठ अनुदान आयोगाने शिक्षक अथवा शिक्षकसमकक्ष दर्जा दिला आहे. आणि त्याअनुषंगाने शासन स्तरावरून आवश्यकते आदेश् निर्गमित करण्यात आलेले आहेत. अशा पदांनाच करिअर ॲडव्हासमेंट स्किम (CAS) अंतर्गत लाभ मंजूर करण्यात यावेत.

४. तसेच प्रपत्र 'अ' मध्ये मंजूर केलेली पदे प्रपत्र 'ब' मध्ये दर्शविल्याप्रमाणे सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात भरण्यात यावीत.

५. यासाठी होणारा खर्च " मागणी क्र. - डब्ल्यु-२ प्रधानशिर्ष २२०२, सर्वसाधारण शिक्षण ०३, विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०२, विद्यापीठांना सहाय्य, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, - (००) (२६) कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठांचा विकास (२२०२ एच ८१२), ३६ सहाय्यक अनुदाने (वेतन) या लेखाशिर्षाखालील त्या त्या वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ११/१४७१, दि. ८/१/२०१३ अन्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३३/व्यय-५, दि. १५/१/२०१३ अन्वये त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०१३०१३०१४४५२०८४०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरी /-

(विकास तु. कदम)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१ मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, मलबार हील, मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
३. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
४. कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
५. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
७. संचालक, उच्च शिक्षण , महाराष्ट्र राज्य, पुणे
८. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे / कोल्हापूर
१०. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. नियोजन विभाग, (का-१४७१) मंत्रालय, मुंबई
१२. वित्त विभाग, (व्यय-५) (अर्थसंकल्प-३ /८) मंत्रालय, मुंबई
१३. कार्यासन अधिकारी (विशि-२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. निवड नस्ती

प्रपत्र अ

शिक्षकीय पदे

| अनु. क्र. | विभागाचे नाव | पदनाम | वेतनसंरचना (आकडे रु.) | | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन श्रेणी | ॲ.ग्रे.पे | |
| १ | स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी | प्राध्यापक | ३७४००-६७००० | १००००/- | ०२ |
| | | उपसंचालक/सहयोगी प्राध्यापक | रु. ३७४००-६७००० | ९०००/- | ०६ |
| | | सहाय्यक संचालक/सहाय्यक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६०००/- | १५ |
| | | | | एकूण | २३ |
| २ | यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट अध्यासन | संचालक /प्राध्यापक | ३७४००-६७००० | १२०००/- | ०१ |
| | | प्राध्यापक | ३७४००-६७००० | १००००/- | ०५ |
| | | उपसंचालक/सहयोगी प्राध्यापक | रु. ३७४००-६७००० | ९०००/- | ०५ |
| | | सहाय्यक संचालक/सहाय्यक प्राध्यापक | १५६००-३९१०० | ६०००/- | १४ |
| | | प्राध्यापक (यशवंतराव चव्हाण अध्यासनाकरिता) | ३७४००-६७००० | १००००/- | ०१ |
| | | | | एकूण | २६ |
| ३ | राजर्षी शाहू रिसर्च सेंटर ॲण्ड म्युझियम कॉम्प्लेक्स | संचालक | ३७४००-६७००० | ९०००/- | ०१ |
| ४ | छत्रपती शाहू महाराज महाराज मराठा इतिहास केंद्र | संचालक | ३७४००-६७००० | ९०००/- | ०१ |
| | | सहाय्यक संचालक | १५६००-३९१०० | ६०००/- | ०१ |
| | | | | एकूण | ०३ |
| ५ | युवा विकास केंद्र | सांस्कृतीक समन्वयक व समुपदेशक | १५६००-३९१०० | ६०००/- | ०१ |
| | | | | एकूण | ०१ |
| | एकूण शिक्षकीय पदे (१+२+३+४+५) | | | | ५३ |

## शिक्षकेतर पदे

| अनु. क्र. | विभागाचे नाव | पदनाम | वेतनसंरचना (आकडे रु.) | | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन श्रेणी | ग्रेड पे | |
| १ | स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | रु. ९३००-३४८०० | ४३००/- | ०४ |
| | | प्रयोगशाळा परीचर | ५२००-२०२००/- | १९००/- | ०४ |
| | | स्टोअर कीपर | ९३००-३४८००/- | ४३००/- | ०१ |
| | | कनिष्ठ सहाय्यक | ५२००-२०२००/- | २४००/- | ०१ |
| | | शिपाई | ४४४०-७४४०/- | १३००/- | ०३ |
| | | | | एकूण | १३ |
| २ | यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट अध्यासन | तंत्रज्ञ- कम-प्रयोगशाळा सहाय्यक | ९३००-३४८००/- | ४३०० | ०१ |
| | | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ९३००-३४८००/- | ४३०० | ०४ |
| | | कनिष्ठ सहाय्यक | ५२००-२०२००/- | २४००/- | ०३ |
| | | शिपाई | ४४४०-७४४०/- | १३००/- | ०१ |
| | | | | एकूण | ०९ |
| ३ | राजर्षी शाहू रिसर्च सेंटर ॲण्ड म्युझियम कॉम्प्लेक्स | प्रकल्प अधिकारी | ९३००-३४८००/- | ४३००/- | ०२ |
| | | कनिष्ठ सहाय्यक | ५२००-२०२००/- | २४००/- | ०१ |
| | | शिपाई | ४४४०-७४४०/- | १३००/- | ०१ |
| | | | | एकूण | ०४ |
| ४ | छत्रपती शाहू महाराज महाराज मराठा इतिहास केंद्र | प्रकल्प अधिकारी | ९३००-३४८००/- | ४३००/- | ०१ |
| | | कनिष्ठ सहाय्यक | ५२००-२०२००/- | २४००/- | ०१ |
| | | शिपाई | ४४४०-७४४०/- | १३००/- | ०१ |
| | | | | एकूण | ०३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | संग्रहालय संकुल | अभिरक्षक (curator) | ९३००-३४८००/- | ४३००/- | ०१ |
| | | चित्ररक्षक सहाय्यक | ५२००-२०२००/- | २४००/- | ०२ |
| | | शिपाई | ४४४०-७४४०/- | १३००/- | ०१ |
| | | | | एकूण | ०४ |
| ६ | युवा विकास केंद्र | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ५२००-२०२०० | २४००/- | ०१ |
| | | कनिष्ठ सहाय्यक | ५२००-२०२००/- | २४००/- | ०१ |
| | | शिपाई | ४४४०-७४४०/- | १३००/- | ०१ |
| | | | | एकूण | ०३ |
| ७ | कन्व्हेंशन सेंटर | व्यवस्थापक | ९३००-३४८००/- | ४३००/- | ०२ |
| | | व्यवस्थापक (गृह व्यवस्थापक) | ५२००-२०२००/- | २४००/- | ०२ |
| | | मुख्य स्वयंपाकी | ५२००-२०२००/- | २४००/- | ०३ |
| | | स्वच्छक | ४४४०-७४४०/- | १३००/- | ०४ |
| | | सर्व्हिसमन | ४४४०-७४४०/- | १३००/- | १० |
| | | शिपाई | ४४४०-७४४०/- | १३००/- | ०३ |
| | | | | एकूण | २४ |
| | **एकूण शिक्षकेतर पदे (१+२+३+४+५+६+७)** | | | | ६० |

*********

(शासन निर्णय क्र. एसयुके २०१३/(२२ / १३)/ विशि-१, दि. ३० जानेवारी, २०१३ चे सहपत्र)

## प्रपत्र ब

## शैक्षणिक वर्ष २०१३- २०१४

| अ. क्र | विभागाचे / संकुलाचे नाव | शिक्षकीय पदे | | | शिक्षकेत्तर पदे | | | एकूण मंजूर पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | पदसंख्या | एकूण पदे | पदनाम | पदसंख्या | एकूण पदे | |
| १ | स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी | प्राध्यापक | -- | ०५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०३ | १० | १५ |
| | | उपसंचालक/ सहयोगी प्राध्यापक | ०१ | | प्रयोगशाळा परीचर | ०३ | | |
| | | सहाय्यक संचालक/सहाय्यक प्राध्यापक | ०४ | | स्टोअर कीपर | ०१ | | |
| | | | | | कनिष्ठ सहाय्यक | ०१ | | |
| | | | | | शिपाई | ०२ | | |
| २ | यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट व अध्यासन | संचालक /प्राध्यापक | ०१ | २१ | तंत्रज्ञ-कम-प्रयोगशाळा सहाय्यक | ०१ | ०९ | ३० |
| | | प्राध्यापक | ०५ | | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०४ | | |
| | | सहाय्यक संचालक सहाय्यक प्राध्यापक | १४ | | कनिष्ठ सहाय्यक | ०२ | | |
| | | प्राध्यापक (यशवंतराव चव्हाण अध्यासनाकरिता) | ०१ | | कनिष्ठ सहाय्यक | ०१ | | |
| | | | | | शिपाई | ०१ | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | राजर्षी शाहू रिसर्च सेंटर ॲण्ड म्युझियम कॉम्प्लेक्स | संचालक | ०१ | ०१ | प्रकल्प अधिकारी | ०२ | ०४ | ०५ |
| | | | | | कनिष्ठ सहाय्यक | ०१ | | |
| | | | | | शिपाई | ०१ | | |
| ४ | छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास केंद्र | संचालक | ०१ | ०२ | प्रकल्प अधिकारी | ०१ | ०३ | ०५ |
| | | सहाय्यक संचालक | ०१ | | कनिष्ठ सहाय्यक | ०१ | | |
| | | | | | शिपाई | ०१ | | |
| ५ | संग्रालय संकुल | ---------- | ----- | ---- | अभिरक्षक (curator) | ०१ | ०४ | ०४ |
| | | | | | चित्ररक्षक सहाय्यक | ०२ | | |
| | | | | | शिपाई | ०१ | | |
| ६ | युवा विकास केंद्र | सांस्कृतीक समन्वयक व समुपदेशक | ०१ | ०१ | डेटा एन्ट्री ऑपरेटर | ०१ | ०३ | ०४ |
| | | | | | कनिष्ठ सहाय्यक | ०१ | | |
| | | | | | शिपाई | ०१ | | |
| ७ | कन्व्हेंशन सेंटर | ---------- | ------ | ------ | व्यवस्थापक | ०२ | २४ | २४ |
| | | | | | व्यवस्थापक (गृह व्यवस्थापक) | ०२ | | |
| | | | | | मुख्य स्वयंपाकी | ०३ | | |
| | | | | | स्वच्छक | ०४ | | |
| | | | | | सर्व्हिसमन | १० | | |
| | | | | | शिपाई | ०३ | | |
| | | एकूण | | | | | | ८७ |

## शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५

| अ. क्र | विभागाचे / संकुलाचे नाव | शिक्षकीय पदे | | | शिक्षकेत्तर पदे | | | एकूण मंजूर पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | पदसंख्या | एकूण पदे | पदनाम | पदसंख्या | एकूण पदे | |
| १ | स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी | प्राध्यापक | -- | ०४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०१ | ०३ | ०७ |
| | | उपसंचालक/ सहयोगी प्राध्यापक | -- | | प्रयोगशाळा परीचर | ०१ | | |
| | | सहाय्यक संचालक/ सहाय्यक प्राध्यापक | ०४ | | शिपाई | ०१ | | |
| २ | यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट व अध्यासन | उपसंचालक/ सहयोगी प्राध्यापक | ०५ | ०५ | | | | ०५ |
| | | | | एकूण | | | | १२ |

## शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६

| अ. क्र | विभागाचे / संकुलाचे नाव | शिक्षकीय पदे | | | शिक्षकेत्तर पदे | | | एकूण मंजूर पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | पदसंख्या | एकूण पदे | पदनाम | पदसंख्या | एकूण पदे | |
| १ | स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी | प्राध्यापक | ०१ | ०६ | | | | ०६ |
| | | उपसंचालक/ सहयोगी प्राध्यापक | ०१ | | | | | |
| | | सहाय्यक संचालक/ सहाय्यक प्राध्यापक | ०४ | | | | | |
| एकूण | | | | | | | | ०६ |

## शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७

| अ. क्र | विभागाचे / संकुलाचे नाव | शिक्षकीय पदे | | | शिक्षकेत्तर पदे | | | एकूण मंजूर पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | पदसंख्या | एकूण पदे | पदनाम | पदसंख्या | एकूण पदे | |
| १ | स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी | प्राध्यापक | -- | ०५ | | | | ०५ |
| | | उपसंचालक/ सहयोगी प्राध्यापक | ०२ | | | | | |
| | | सहाय्यक संचालक/ सहाय्यक प्राध्यापक | ०३ | | | | | |
| | एकूण | | | | | | | ०५ |

## शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८

| अ. क्र | विभागाचे / संकुलाचे नाव | शिक्षकीय पदे | | | शिक्षकेत्तर पदे | | | एकूण मंजूर पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पदनाम | पदसंख्या | एकूण पदे | पदनाम | पदसंख्या | एकूण पदे | |
| १ | स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी | प्राध्यापक | ०१ | ०३ | ----- | --- | -- | ०३ |
| | | उपसंचालक/ सहयोगी प्राध्यापक | ०२ | | | | | |
| | एकूण | | | | | | | ०३ |

**************

शिक्षकीय पदांचा आकृतीबंध
निश्चित करणे बाबत.............
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र. एसयुके-२००७/(४७/०७)/विशि (प्रशा)
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ मे, २००९.

वाचा : (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दि.१०.९.२००१.
(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.असक-१००१/प्र.क्र.२९(भाग-६)/२००४/वित्तीय सुधारणा, दिनांक १.७.२००४.
(३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.युएनआय/शिवि/२००७/आढावा/विशि-१/४०४४, दिनांक ४-६-२००८ चे पत्र.
(४) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे क्र.आस्थापना/पीजी/५७८४, दि. ८-१२-२००८ चे पत्र.

प्रस्तावना:- वित्त विभागाने संदर्भाधीन क्र.१ येथील दि.१०.९.२००१ च्या शासन निर्णयान्वये पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध निश्चित करावे व आकृतिबंध अंतिम झाल्याशिवाय रिक्त पदे भरु नयेत असे सर्व प्रशासकीय विभागांना आदेशित केले. वित्त विभागाच्या वरील निर्णयानुसार राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठाच्या शिक्षकीय व शिक्षकेतर पदांचा आढावा घेऊन आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

२. सदर प्रक्रियेला लागणारा विलंब लक्षात घेता शासनाने संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक १ जुलै, २००४ च्या शासन निर्णयान्वये मागासवर्गीय प्रवर्गाची ९०% व खुल्या प्रवर्गाची ५०% रिक्त पदे भरण्याची मुभा दिली. अशी सूट देऊनही अपुऱ्या मनुष्यबळामुळे विद्यापीठाच्या कामावर विपरीत परिणाम होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. वित्त विभागाच्या दि.१०.९.२००१ च्या निर्णयामुळे एका बाजुला सन २००१ रोजी अस्तित्वात असलेली रिक्त पदे भरता आली नाहीत, तर दुसऱ्या बाजुला सन २००१ नंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजूर केलेल्या पदांच्या बाबतीत सुध्दा निर्णय घेता आला नाही. दरम्यानच्या काळामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने याचिका क्र.८०६७/२००६ मध्ये दि.०६-०४-२००९ रोजी व नागपूर खंडपीठ यांनी सुमोटो याचिका क्र.२२१६/२००६ मध्ये दिनांक

16 JUN 2009
565

३-१२-२००८ रोजी राज्यातील शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती पावले उचलावीत व विद्यापीठाचा आकृतिबंध त्वरीत निश्चित करावा असे आदेशित केले.

३. विद्यापीठातील अपुऱ्या मनुष्यबळामुळे शिक्षणावर होणारा संभाव्य दुर्ष्परिणाम व मा.उच्च न्यायालयाचे वरील आदेश विचारात घेता आकृतिबंध त्वरीत निश्चित करणे अपरिहार्य झाले आहे म्हणून सन २००१ नंतर वाढलेल्या कामासाठी आवश्यक असलेल्या शिक्षकीय पदांचा पूर्णपणे विचार न करता सन २००१ पर्यंत शासनाने मंजूर केलेली शिक्षकीय पदेच प्रामुख्याने आधारभूत समजून आकृतीबंध निश्चित करण्याचे ठरविले आहे.

४. वरील बाबींचा विचार करुन विभागाने <u>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर</u> या विद्यापीठाच्या शिक्षकीय पदांच्या आकृतिबंधांचा प्रस्ताव शासनास सादर केला व त्यास मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या उच्च स्तरीय सचिव समितीने दि.१२.५.२००९ रोजी मान्यता दिली. त्यानुसार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठाच्या शिक्षकीय पदांच्या आकृतीबंधासंदर्भात खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

## <u>शासन निर्णय</u>

५. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठासाठी सोबतच्या प्रपत्र "अ" व "ब" मध्ये दर्शविल्याप्रमाणे २१० शिक्षकीय व समकक्ष पदांच्या आकृतीबंधास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर पदांचा सविस्तर तपशील प्रपत्र "क" मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

६. विद्यापीठाने वरील आकृतीबंधाच्या अधीन राहून शासनाने मंजूर केलेल्या सर्व शिक्षकीय पदांपैकी रिक्त असलेली अनुदानित पदे विहित कार्यपध्दती अनुसरुन त्वरीत भरण्यात यावी.

७. विद्यापीठाच्या स्वनिधीतून नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तिची थेट नियुक्ती अथवा अदलाबदली शासन मान्य अनुदानित पदावर करण्यात येऊ नये.

८. सर्व अनुदानित पदांवरील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची विस्तृत माहिती विद्यापीठाने संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच संबंधित विभागीय सह संचालक (उच्च शिक्षण) यांच्याकडे तात्काळ सादर करावा. संचालक, उच्च शिक्षण यांनी सर्व बाबी पडताळून पहाव्यात व त्याचा अभिलेख जतन करावा.

९. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २६९/०९ विसु-१ दि. २/५/२००९ अन्वये आणि उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन
२) मा. कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४) सर्व सह संचालक उच्च शिक्षण,
५) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञयता) महाराष्ट्र, मुंबई
७) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई
८) जिल्हा कोषाधिकारी, पुणे,
९) जिल्हा कोषाधिकारी, कोल्हापूर,
१०) वित्त विभाग
११) निवड धारीका, विशि (प्रशा)

D:\Avinash\GR\SNDT

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शासन निर्णय क्र. एसयुके २००७/(४७//०७)-विशि (प्रशा), दिनांक २७-०५-२००९ चे सहपत्र.

प्रपत्र "अ"

शिक्षकीय पदांचा मंजूर आकृतिबंध

शिक्षक पदे

| संवर्गनिहाय पदनाम (१) | वेतनश्रेणी (२) | आकृतिबंधांतर्गत मान्य पदांची एकूण संख्या (३) |
|---|---|---|
| प्राध्यापक | रु.१६४००-२२४०० | ३८ |
| प्रपाठक | रु.१२०००-१८३०० | ४२ |
| अधिव्याख्याता | रु.८०००-१३५०० | ११६ |
| | एकुण... | १९६ |

D:\Avinash\GR\SNDT

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शासन निर्णय क्र. एसयुके २००७/(४७//०७)-विशि (प्रशा), दिनांक २७%००५%२००९ चे सहपत्र.

प्रपत्र "क"
आकृतिबंधाप्रमाणे शिक्षकीय पदांचा सविस्तर तपशील

| अ. क्र. | विषय | मंजूर पदे | | | नव्याने मान्य केलेली पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राध्यापक | प्रपाठक | अधिव्याख्याता | प्राध्यापक | प्रपाठक | अधिव्याख्याता |
| १. | रसायनशास्त्र | ०४ | ०४ | १८ | ०४ | ०४ | १८ |
| २. | जीवरसायनशास्त्र | ०१ | ०३ | ०४ | ०१ | ०३ | ०४ |
| ३. | प्राणीशास्त्र | ०३ | ०२ | ०९ | ०३ | ०२ | ०९ |
| ४. | वनस्पतीशास्त्र | ०२ | ०४ | ०९ | ०२ | ०४ | ०९ |
| ५. | संख्याशास्त्र | ०२ | ०२ | ०३ | ०२ | ०२ | ०३ |
| ६. | पदार्थविज्ञान | ०३ | ०१ | ११ | ०३ | ०१ | ११ |
| ७. | इलेक्ट्रॉनिक्स | ०२ | ०२ | ०६ | ०२ | ०२ | ०६ |
| ८. | गणित | ०२ | ०२ | ०७ | ०२ | ०२ | ०७ |
| ९. | भूगोल | ०२ | ०२ | ०९ | ०२ | ०२ | ०९ |
| १०. | पर्यावरणशास्त्र | ०१ | ०१ | ० | ०१ | ०१ | ० |
| ११. | राज्यशास्त्र | ०२ | ०१ | ३ | ०२ | ०१ | ३ |
| १२. | अर्थशास्त्र | ०३ | ०३ | ४ | ०३ | ०३ | ४ |
| १३. | इतिहास | ०२ | ०२ | ४ | ०२ | ०२ | ४ |
| १४. | समाजशास्त्र | ०२ | ०३ | ४ | ०२ | ०३ | ४ |
| १५. | ग्रंथालय व माहितीशास्त्र | ०१ | ० | ०२ | ०१ | ० | ०२ |
| १६. | वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र | ० | ०१ | ०२ | ० | ०१ | ०२ |
| १७. | विदेशी भाषा | ० | ० | ०३ | ० | ० | ०३ |
| १८. | इंग्रजी | ०२ | ०२ | ०६ | ०२ | ०२ | ०६ |
| १९. | मराठी | ०२ | ०१ | ०३ | ०२ | ०१ | ०३ |
| २०. | शिक्षणशास्त्र | ०१ | ०२ | ०३ | ०१ | ०२ | ०३ |
| २१. | संगीत | ० | ०१ | ०३ | ० | ०१ | ०३ |
| २२. | हिंदी | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ |
| २३ | वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र | ० | ०१ | ०२ | ० | ०१ | ०२ |
| २४ | स्त्री अभ्यास केंद्र | ० | ०१ | ० | ० | ०१ | ० |
| | एकूण | ३८ | ४२ | ११६ | ३८ | ४२ | ११६ |

D:\Avinash\GR\SNDT

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शासन निर्णय क्र. एसपवे २००८/(४७//०७)-विशि (प्रशा), दिनांक २६-०५-२००९ चे सहपत्र.

प्रपत्र "ड"

शिक्षक समकक्ष पदांचा तपशील

| समकक्ष पद | वेतनश्रेणी | आकृतिबंधांतर्गत मान्य पदांची एकूण संख्या |
|---|---|---|
| ग्रंथपाल (प्राध्यापक पदाशी समकक्ष) | १६४००-२२४०० | १ |
| संचालक ( प्रौढ व निरंतर शिक्षण ) (प्राध्यापक पदाशी समकक्ष) | १६४००-२२४०० | १ |
| सहायक संचालक (प्रौढ व निरंतर शिक्षण ) (प्रपाठक पदाशी समकक्ष) | १२०००-१८३०० | २ |
| उप ग्रंथपाल (प्रपाठक पदाशी समकक्ष) | १२०००-१८३०० | १ |
| वैज्ञानिक अधिकारी (प्रपाठक पदाशी समकक्ष) | १२०००-१८३०० | १ |
| प्रौढ व निरंतर शिक्षण (अधिव्याख्याता पदाशी समकक्ष) | ८०००-१३५०० | २ |
| सहायक ग्रंथपाल (अधिव्याख्याता पदाशी समकक्ष) | ८०००-१३५०० | २ |
| क्रिडा (शारीरिक शिक्षण) (अधिव्याख्याता पदाशी समकक्ष) | ८०००-१३५०० | ३ |
| युसिक (अधिव्याख्याता पदाशी समकक्ष) | ८०००-१३५०० | १ |
| | एकूण.... | १४ |

D:\Avinash\GR\SNDT

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठातील ग्रंथालय संवर्गातील Assistant Archivist हे बिगर सुट्टीचे शैक्षणिक पद म्हणून घोषित करणे व त्या पदावरील डॉ. एम.एन.माने यांची सेवा शिक्षक समकक्ष ग्राह्य धरण्याबाबत...

महाराष्ट्र शासन,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक एसवूके २०१०/(५७५/१०)-विशि-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१०.

वाचा : १) विद्यापीठ अनुदान आयोगाचे क्र.एफ.१-२/२००९(पीएस), दि.२६ जुलै, २०१० चे पत्र.
२) शासन निर्णय क्र.युएसजी १९९५/(१९३/९५)-विशि-३, दि.१४ नोव्हेंबर, १९९५ चे पत्र.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, १९९४ च्या कलम २(३४) मधील तरतूदीनुसार ग्रंथपाल, उप ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल या ग्रंथालयातील संवर्गातील पदांना शैक्षणिक पदांमध्ये समाविष्ट केलेले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने क्र.एफ.१-२/२००९(पीएस), दि.२६ जुलै, २०१० च्या पत्रान्वये Assistant Archivist हे पद सहायक ग्रंथपाल या पदाशी समकक्ष असून बिगर सुट्टीचे शैक्षणिक पद असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार सदर पदाचा शिक्षक समकक्ष म्हणून पदामध्ये समावेश करण्यास त्याचप्रमाणे संदर्भाधीन अनु.क्र.२ येथील शासन निर्णयाप्रमाणे सदर पदास बिगर सुट्टीचे शैक्षणिक पद म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

२. (i) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या विद्यापीठातील Assistant Archivist या पदास सहायक ग्रंथपाल या पदाप्रमाणेच शिक्षक समकक्ष पद म्हणून शासन मान्यता देत आहे.

(ii) सदर पदास बिगर सुट्टीचे शैक्षणिक पद म्हणून घोषित करण्यात येत आहे.

(iii) सदर पदावरील डॉ. एम.एन.माने यांना शिक्षक समकक्ष पदांमध्ये समाविष्ट करण्यास शासन मान्यता देत आहे.

(iv) सदर पदाचा शिक्षक समकक्ष पदांमध्ये समावेश झाल्यामुळे विद्यापीठातील शिक्षकीय पदांची संख्या २११ होईल.

(v) तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन दीर्घ सुट्ट्यांच्या कालावधीत ग्रंथालये सुरु ठेवणे आवश्यक आहे. त्यामध्ये ग्रंथालयीन संवर्गातील पदांना दीर्घ सुट्ट्या अनुज्ञेय नाहीत. सदर Assistant Archivist हे पद ग्रंथालयीन संवर्गातील शिक्षक समकक्ष पद असल्यामुळे सदर पदासही दीर्घकालीन सुट्ट्या अनुज्ञेय होणार नाहीत. त्यामुळे सदर पदास इतर शिक्षक समकक्ष व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू असलेले क्र.संकीर्ण २०१०/(३२२/२०१०)/विशि-१, दि.२० मे, २०१० अन्वये लागू केलेले महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू राहतील.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०१०१२२४१६१९१४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
३) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
४) कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
५) विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर,
६) महालेखापाल - १, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), मुंबई
७) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
८) निवड नस्ती.

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार सांविधिक पदे निर्माण करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पदनि-२०१७/प्र.क्र.१६७/१७/विशि-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १४ जानेवारी, २०१९

**वाचा :-**

१) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण क्र.एनजीसी-२००९/(२४३/०९)/विशि-१, दि.१२ ऑगस्ट, २००९.
२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा अधिनियम, दि.०१ मार्च, २०१७ पासून अंमलात आलेला आहे. सदरहू अधिनियमातील कलम-१५ नुसार विद्याशाखेचा अधिष्ठाता हे सांविधिक पद निर्माण करण्याबाबतची तरतूद आहे. प्रत्येक विद्यापीठातील प्रत्येक विद्याशाखेसाठी एक अधिष्ठाता पदाची तरतूद असून ते पूर्ण वेतनी आहे. सदरहू पद निवड समितीच्या शिफारशींनुसार कुलगुरूकडून नियुक्ती करण्यात येईल. अधिष्ठाता पदाचा पदावधी हा कुलगुरूच्या पदावधीइतकाच किंवा त्याचे नियत वयोमान पूर्ण होईपर्यंत यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत आहे. सदरहू पदाच्या निवडीच्या प्रयोजनार्थ असलेली अर्हता व अनुभव, प्राध्यापक किंवा प्राचार्य पदाची जी अर्हता असेल तीच अर्हता असेल आणि अध्यापनाचा व संशोधनाचा एकूण पंधरा वर्षापेक्षा कमी नसेल असा अनुभव असेल. सदरहू अधिनियमातील कलम-३४ (२) नुसार विद्यापीठात पुढील विद्याशाखा असतील :-

१. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
२. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
३. मानवविज्ञान विद्याशाखा
४. आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा

या अधिनियमाच्या कलम-१६ मध्ये विद्याशाखेचा अधिष्ठाता या पदाचे अधिकार व कर्तव्ये विहित केलेली आहेत. विद्यापीठामधील अधिष्ठाता पदाची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व शैक्षणिक दृष्ट्या असलेले महत्व इ. बाबी विचारात घेऊन विद्यापीठांमध्ये अधिष्ठातांची पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

शासन या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे राज्यातील अकृषि विद्यापीठांसाठी “विद्याशाखा अधिष्ठाता” ची पदे मंजूर करीत आहे.

| अ.क्र. | विद्यापीठाचे नाव | पदनाम | वेतनश्रेणी | मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | विद्याशाखा अधिष्ठाता | रू.३७,४००-६७,००० ग्रेड पे रू.१०,००० | ०४ |
| २ | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | | | ०४ |
| ३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | | | ०४ |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद | | | ०४ |
| ५ | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | | | ०४ |
| ६ | संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतील, | | | ०२ |
| ७ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | | | ०२ |
| ८ | गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | | | ०२ |
| ९ | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | | | ०२ |
| १० | श्रीम. नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई, | | | ०२ |
| ११ | सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | | | ०२ |
| | | | **एकूण** | **३२** |

२. वरील तक्त्यामधील अनु.क्र.१ ते ५ येथील विद्यापीठांसाठी मंजूर केलेल्या ०४ पदांपैकी ०२ पदे सदर विद्यापीठांसाठी मंजूर असलेल्या शिक्षकीय पदांपैकी रू.१५,६००-३९,१०० व ग्रेड वेतन रू.६,०००/- या वेतनश्रेणीतील रिक्त असलेली सहायक प्राध्यापकांची पदे रू.३७,४००-६७,००० व ग्रेड वेतन रू.१०,०००/- या वेतनश्रेणीमध्ये “विद्याशाखा अधिष्ठाता” म्हणून दर्जोन्नत (Upgrade) करण्यात येत आहेत.

३. सदरहू पदे भरण्यास व पुढे रिक्त झाल्यास ती भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. यासाठी होणाऱ्या वार्षिक आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६८७/आपुक, दि.१५.१२.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीने व मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०११४१५३१०६६१०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Eknath Sable

Digitally signed by Vijay Eknath Sable
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ad74dd20b49c8ab0bc83f54f3d9c91571a6cd47aeb9a9f05783d44cafe7a7d8e, serialNumber=ad8df0c87ab8e6c9f8574ab838dd4c466ebe81828f43e76bfa02129f8e862cd2, cn=Vijay Eknath Sable
Date: 2019.01.14 17:03:37 +05'30'

**( विजय साबळे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे,
४) कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (५ प्रती)
६) महालेखापाल (लेखा व परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (५ प्रती)
७) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
८) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
९) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१०) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
११) अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१३) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
१४) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई,
१५) वित्त विभाग (सेवा-४/सेवा-९/कोषा-५/व्यय-५/अर्थ-८), मंत्रालय, मुंबई
१६) निवड नस्ती (विशि-१)

**42 Teachers are filled on Non-grant basis in the university capacity (Self-Financed).**